**शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये सुधारणा करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक बीसीएच २०१०/प्र.क्र.४३०/मावक-४**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : २६ जुलै,२०११**

वाचा : १. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक बीसीएच १०८२/९०३८५/(३८)बीसीडब्ल्यु-४ दिनांक १६ मे, १९८४

२. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक बीसीएच १०८२/९०३८५/(३८)बीसीडब्ल्यु-४ दिनांक २४ ऑगस्ट १९८४

३. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक बीसीएच १०९०/४१७८२६/(४)मावक-४ दिनांक ५ नोव्हेंबर १९९०

४. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच १०९२/ १९०/मावक-४ दिनांक २० सप्टेंबर १९९४

५. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच १०९४/ ४१७/मावक-४ दिनांक २८ मार्च १९९५

६. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच १०९५/ प्र.क्र.२३१/मावक-४ दिनांक १० जून १९९६

७. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच १०९६/ प्र.क्र.१४/मावक-४ दिनांक १३ जून १९९६

८. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच १०९६/ २१७२४/३१८/मावक-४ दिनांक १५ ऑक्टोबर १९९६

९. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच १०९७/ प्र.क्र.३५२/मावक-४ दिनांक ४ एप्रिल १९९८

१०.शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच प्र.क्र.३५२/मावक-४ दिनांक ३० जून १९९८

११.शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच २०००/ प्र.क्र.२१४/मावक-४ दिनांक २६ जून २००१

१२.शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बीसीएच २००१/प्र.क्र. ४९२/मावक-४ दिनांक १७ जानेवारी २००२

१३.शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बीसीएच २००३/प्र.क्र. ६५५/मावक-४ दिनांक ६ जुलै २००४

१४.शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक बीसीएच २००६/प्र.क्र. ४४९/मावक-४ दिनांक २० ऑक्टोबर २००६

१५.संचालक, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्रमांक सकसं/शिक्षण/शावगृह/शा.नि./ सुधारणा/१०-११/का-५-अ/६४४, दिनांक १६.७.२०१०

**प्रस्तावना :-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यामध्ये मागासवर्गीय मुलामुलींसाठी शासकीय वसतीगृहे चालविली जातात. मागावर्गीयांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती तसेच त्यांचे राहणीमान, समाजातील इतर घटकांप्रमाणे त्यांना जीवन जगता यावे तसेच, त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत शासकीय वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना निवासाची व भोजनाची मोफत व्यवस्था, क्रमिक पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य इत्यादी सोयी-सुविधा शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक बीसीएच १०८२/९०३८५/(३८)बीसीडब्ल्यु-४ दिनांक १६ मे, १९८४ अन्वये पुरविण्यात येतात, त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने दि.१८.७.२०११ रोजी संचालक, समाज कल्याण, पुणे यांनी दि.१६.७.२०१० रोजीच्या प्रस्तावानुसार सुचविलेल्या सुधारणांना मान्यता दिली आहे. सदर बाब विचारात घेऊन, शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक बीसीएच १०८२/९०३८५/(३८)बीसीडब्ल्यु-४ दिनांक १६ मे, १९८४ अन्वये शासकीय मागासवर्गीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये उच्चाधिकार समितीने सुचविलेल्या सुधारणांना शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता देण्यात आलेल्या सोयी-सुविधांचा तपशील **"परिशिष्ट- १"** सोबत जोडले आहे.

**२.** शासकीय मागासवर्गीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांसाठीचा खर्च योजनांत र्गत योजनेतील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

**३.** यासाठी होणारा खर्च मागणी क्र. एन-३, २२२५-३३४२ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण ०१, अनुसूचित जातीचे कल्याण २७७ शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (विघयो) (०१) (१३) अनुसूचित जातीतील मुले व मुली यांच्याकरिता शासकीय वसतीगृहे सुरू करणे व त्यांचे परीरक्षण या मुख्य लेखाशिर्षाखाली केलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यांत यावा.

**४.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २१३/व्यय-१४ दि. २६.७.२०११ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

**५.** सदर आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०७२६१५२४३१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( दिनेश वाघमारे )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्विय सहायक
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सा.न्या.व वि. स.वि. यांचे स्वीय सहाय्यक
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वि.जा.भ.ज.संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखापरीक्षा/अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षक, मुंबई /मुंबई उपनगर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व विभागीय स्तरावरील शासकीय वसतीगृहांचे गृहप्रमुख
सर्व शासकीय वसतीगृहांचे गृहपाल
वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मंबई
कार्यासन अधिकारी, विघयो-१, सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प शाखा, सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (मावक-४)

**परिशिष्ट-१**

**शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१०/ प्र.क्र.४३०/मावक-४, दि.२६ जुलै,२०११ चे सहपत्र**

| | |
|---|---|
| १ | शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भोजनात गहू/बाजरी/ज्वारी/तांदूळ (भात)/दाळ/भाजीपाला/कंदभाजी इत्यादी वस्तूंचा पुरवठा अमर्यादित(पोटभर) करण्यात यावा. |
| २ | नाश्त्यासाठी-विद्यार्थ्यांना उसळ/पोहे/उपमा/ शिरा यापैकी एक , दूध (साखरेसह),उकडलेली २ अंडी दररोज व शाकाहारी मुलांसाठी कॉर्न प्लेक्स (सिरीयल), प्रत्येक दिवशी एक सफरचंद व ऋतुमानाप्रमाणे मिळणारे एक फळ (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ३ | मटन/चिकन दर आठवड्याला ५०० ग्रॅम प्रतिविद्यार्थी याप्रमाणे आठवडयातून दोनदा, दरवेळी प्रतिविद्यार्थी २५०ग्रॅम प्रमाणे भात/पुलाव सलाड सह. (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ४ | शाकाहारी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक वेळी २ भाजी, वरण व दही, भात व एक गोडपदार्थ (स्वीट) आठवडयातून २ वेळा (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ५ | दररोज प्रत्येक जेवणात आवश्यक तेवढे कांदा,लिंबू, लोणचे, पापड, सलाड व ५० ग्रॅम गावरान तुप (दर आठवड्यात) (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ६ | कंत्राटदाराची निवड २ पाकीट लिलाव पध्दतीनुसार करावी व अनुभवी व नामांकित कंत्राटदार असावा. (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ७ | **निर्वाह भत्ता**-<br>विभागीयस्तर दरमहा रू.८००/-प्रत्येकी,<br>जिल्हास्तर दरमहा रू.६००/- प्रत्येकी,<br>तालुकास्तर दरमहा रू.५००/- प्रत्येकी (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ८ | मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठी आतिरिक्त रू.१००/- दरमहा (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ९ | शालेय गणवेश रू.५००/- प्रमाणे प्रत्येकी २ जोड दरवर्षी (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १० | महाविद्यालयीन स्तर जेथे ड्रेस कोड असेल तेथे प्रति विद्यार्थी रू.१०००/- प्रमाणे २ जोड (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| ११ | वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या ॲप्रनसाठी रू.५००/- प्रती विद्यार्थी दरवर्षी. (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १२ | वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यानंतर लगेचच वैद्यकीय साहित्यासाठी रू.१०००/- प्रति विद्यार्थी देण्यात यावेत. वैद्यकीय शाखेसाठी स्टेथोस्कोपसाठी रू.१०००/- व इतर साहित्यासाठी रू.१०००/- असे एकूण रू.२०००/- प्रति विद्यार्थी दरवर्षी. (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १३ | आभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी बॉयलर सुटसाठी प्रतिवर्षी प्रतिविद्यार्थी रू.५००/- (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १४ | आभियांत्रिकी पदवी/पदविकाच्या ड्रॉईंग बोर्ड व इतर साहित्यासाठी प्रति विद्यार्थी रू.२५००/- दरवर्षी (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १५ | लॅब ॲप्रनसाठी रू.५००/- प्रतिविद्यार्थी दरवर्षी (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १६ | शारिरीक शिक्षण महाविद्यालय २ गणवेशासाठी रू.४०००/- प्रति विद्यार्थी दरवर्षी (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १७ | छत्री/रेनकोट व गमबूट दरवर्षी रू.५००/- प्रमाणे प्रति विद्यार्थी (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १८ | कला शाखेतील चित्रकला, संगीत व इतर पदवी/पदविका तसेच विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले साहित्यासाठी रू.४०००/- दरवर्षी प्रति विद्यार्थी. (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| १९ | शैक्षणिक सहलीसाठी प्रत्येकी रू.२०००/- दरवर्षी प्रति विद्यार्थी (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| २० | शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी कार्यशाळेकरिता रू.५००/- प्रति विद्यार्थी प्रतीवर्ष |
| २१ | प्रोजेक्ट रिपोर्टसाठी प्रति विद्यार्थी रू.१०००/- प्रती प्रकल्प (शासकीय वसतीगृहांसाठी) |
| २२ | स्नेहसंम्मेलन/करमणुक व्यवस्थेसाठी प्रति शासकीय वसतिगृह रू.२५०००/- दरवर्षी (साऊंड सिस्टीम साहित्य व इतर खर्चासाठी) |

| | |
|---|---|
| २३ | क्रीडा वस्तु खरेदीसाठी प्रति शासकीय वसतिगृह रू.१००००/- दरवर्षी |
| २४ | प्रत्येक शासकीय वसतिगृहासाठी एक कलर टी.व्ही. ४० ते ५० इंची स्क्रीनचा खरेदी करता येईल. तसेच वैज्ञानिक अथवा संशोधनात्मक चॅनल करिता डिश ॲन्टीना व पेड चॅनल करिता रू.१०,०००/- प्रति वर्ष प्रति वसतिगृह. |
| २५ | प्रत्येक शासकीय वसतिगृहासाठी ॲक्वॉगार्ड व वॉटर कुलर देण्यात यावे. पाणी साठविण्यासाठी पुरेशी व्यवस्था करावी तसेच वार्षिक देखभालीचा वार्षिक देखभाल करार (ए.एम.सी.) पुरवठादार यांचे सोबत करावा. |
| २६ | प्रत्येक शासकीय वसतीगृहात फायर फायटींग सुविधा लागू करावी. तसेच देखभालीचा वार्षिक देखभाल करार (ए.एम.सी.) पुरवठादार यांचे सोबत करावा. |
| २७ | शासकीय वसतिगृहामध्ये १० विद्यार्थ्यांसाठी एक संगणक, इंटरनेट सुविधेसह उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच एका वसतिगृहासाठी एक प्रिंटर खरेदी करावे तसेच वार्षिक देखभालीचा वार्षिक देखभाल करार (ए.एम.सी.) पुरवठादार यांचे सोबत करावा. |
| २८ | केंद्र शासनाच्या अनुसूचीत जाती शिष्यवृत्तीसाठी जी उत्पन्न मर्यादा आहे ती उत्पन्न मर्यादा शासकीय व अनुदानित वसतीगृहातील विद्यार्थी प्रवेशासाठी ठेवावी. तसेच केंद्र शासन ज्या ज्या वेळी त्यात सुधारणा करेल त्या सुधारणा या बाबतीत आपोआप लागु होतील. |
| २९ | सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये ६ महिन्यातून एकदा पेस्ट कंट्रोल करण्यात यावे. तसेच शासकीय वसतिगृहामध्ये इन्व्हर्टरची व्यवस्था करावी. त्याच प्रमाणे सोलर उर्जेची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी व देखभाली करीता पुरवठादारासोबत वार्षिक करार (ए.एम.सी.) करावा. |
| ३० | सर्व वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा राजीव गांधी विमा योजने अंतर्गत शासनामार्फत विमा काढावा. |
| ३१ | सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये अद्ययावत ग्रंथालय असावे व त्यासाठी स्वतंत्र कक्ष असावा. ग्रंथालयामध्ये आवश्यक सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करावी. त्याकरिता स्पर्धा परीक्षेसाठी दरवर्षी रू. २.०० लाख प्रति वसतिगृह खर्च अनुज्ञेय राहील. ग्रंथालयामध्ये एल.सी.डी., संगणक इंटरनेटसह, आवश्यक सर्व प्रकारचे फर्नीचर व ई-लायब्ररीच्या सर्व सुविधा असाव्यात. तसेच ५ वर्तमान पत्रे (इंग्रजी व मराठी ) आणि १० शिक्षण उपयोगी मासिके त्यामध्ये प्रामुख्याने सामान्य ज्ञान, स्पर्धा परिक्षा, मार्गदर्शन, चालू घडामोडी बाबत अंक इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतील असावेत. |
| ३२ | वर्षातून दोनदा पालक सभा आयोजित करण्यात याव्यात. याकरिता रू.१०,०००/- प्रति पालकसभा, प्रती शासकीय वसतिगृह खर्च अनुज्ञेय राहील. |
| ३३ | गृहपालाने विद्यार्थ्यांच्या शाळा/कॉलेजात वर्षातून किमान दोनदा भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या समस्ये बाबत, उपस्थिती बाबत, व अभ्यासक्रमातील प्रगती बाबत चर्चा करावी. व त्यानुसार उपाययोजना करावी. |
| ३४ | सर्व शासकीय वसतिगृहातील भिंतीवर व मोक्याच्या जागी थोर समाजसुधारकांचे सुविचार लिहावेत. तसेच ग्रंथालयात भित्तीपत्रक चालवावेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या मार्फत कविता, लेख, व इतर उत्कृष्ट, नाविन्यपूर्ण साहित्य प्रकाशित करावे. सदर सुविचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, मार्फत तयार करण्यात यावेत.<br>सर्व शासकीय वसतीगृहांत पुरेशा प्रमाणात दीर्घकाळ टिकणारी अनेक प्रजातीची झाडे लावण्यात यावीत. |
| ३५ | भारतीय राज्य घटनेच्या कलम ४६ नुसार उपरोक्त १ ते ३४ मुद्यांचा निधी अनु.जातीच्या कल्याणासाठी वापरावयाचा असल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी करताना कंत्राट अथवा ठेका देताना अनु.जातीच्या सहकारी संस्था, इतर संस्था व अनु.जातींच्या महिलांचे बचत गट व अनु.जातीच्या व्यक्तींना प्रथम प्राधान्य द्यावे. |
| ३६ | शासकीय वसतिगृहातील सर्व मुला/मुलींना १० दिवसांच्या विपश्यना प्रशिक्षणाकरिता योग्य वेळेनुसार सोईच्या ठिकाणी पाठविण्यात यावे. यासाठी होणारा खर्च मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा. |
| ३७ | सदर शासन निर्णयात/नियमात दर पाच वर्षांनी अद्ययावत सुधारणा करण्यात याव्यात. |

**** O *****